## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १३/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, घुग्घुस, दुर्गापुर, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, चिमुर, नागभिड, सिंदेवाही, कोठारी, विरूर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२१** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन १३ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **५,१६,९६०/–रू.** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

————————————————————————————————————————

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन वरोरा :–**

दिनांक **१३/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **वरोरा** अंतर्गत सुभाष वार्ड येथे ०१ आरोपी ईसम हा क्रिकेटच्या सामन्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **वरोरा** येथे अप. क्र. **२८५/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **६५,७१०/–रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **वरोरा** पोलीस करीत आहे.

————————————————————————————————————————

**२)पोलीस स्टेशन शेंगाव :-**

दिनांक **१३/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **शेंगाव** अंतर्गत इंदीरा नगर येथे ०१ आरोपी ईसम हा सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **शेंगाव** येथे अप. क्र. **११७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा आणि कलम १०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२१,१९५/-रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **शेंगाव** पोलीस करीत आहे.

---

**३)पोलीस स्टेशन सिंदेवाही :-**

दिनांक **१३/०३/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **सिंदेवाही** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सटट्रापटट्रीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **सिंदेवाही** येथे अप. क्र. **१४९/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२१,१९५/-रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **सिंदेवाही** पोलीस करीत आहे.

---

# एकाच दिवसात ८५ लक्षच्यावर दारूसाठा जप्त
# चंद्रपुर पोलीसांची कार्यवाही

जवळच आलेला होळी सण आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर अवैध दारू तस्करीवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन दारू तस्करी करणाऱ्यांवर कार्यवाही करीत रामनगर पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी छापा टाकुन **६४० पेटया** अवैध दारू एकुण किं. **८५,९७,६००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १३/०३/२०१९ रोजी रामनगर पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, शुभम रमेश जयस्वाल नामक व्यक्तीने लोहारा येथील एका हॉटेल समोरील बंद गोदाममध्ये अवैधरित्या दारूचा साठा करून ठेवला आहे. अशा माहितीवरून रामनगर पोलीस पथकाने छापा टाकला असता एका आरोपीसह १) २८७ पेटया रॉयल चॅलेंज विदेशी दारू किं. ४१,३२,८००/—रू., २) १४२ पेटया रॉयल स्टॅग विदेशी दारू किं. २०,५९,२००/—रू, ३) ३८ पेटया इंपेरीयल ब्ल्यु विदेशी दारू किं. ५,४७,२००/—रू, असा एकुण **६७,३९,२००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हयात घटनास्थळावरून आरोपी नामे स्वप्नील उर्फ मोगली मनोहर शेंडे, वय २७ रा. नगीनाबाग चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे.

तसेच दिनांक १३/०३/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीवरून जलनगर वार्ड येथील दारूविक्रेती एका महिलेच्या घरी छापा टाकुन १) रॉकेट देशी दारुच्या १३४ पेटया २) किंग फिशर कंपनी बियरचे ९ पेटया ३) ऑफिसर चॉईस विस्कीच्या २६ पेटया ४) ऑफिसर चॉईस ब्लु कंपनीच्या ४ पेटया असा एकूण **१८,५८,४००/—रु** चा माल जप्त केला आहे.

दोन्ही गुन्हयात एकुण **६७,३९,२००/—रू** चा दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन, सदरचे गुन्हे पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आले असुन पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेळकर यांचे नेतृत्वात पोनि. श्री. प्रकाश हाके, पोउपनि कापडे, पोना सुधिर, रामभाउ राठोड, शंकर येरमे, चिकाटे, पोशि निमगडे, पठाण, पराते, अमित, सुर्यभाम बल्की, आणि स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही परि. आयपीएस श्री. नवनित कांवत यांचे सह पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स्थागुशा चंद्रपूर यांचे नेतृत्वात सफौ पंडीत वऱ्हाटे, नापोशि चंदू नागरे, नापोशि अविनाश दशमवार, नापोशि जमिल खान पठाण यांनी पार पाडली.

---